## प्रेसनोट दिनांक ०८/०७/२०१९

## फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे

**व्यापाराचे हरविलेले ४ लाख रुपयांचा शोध सी.सी.टी.व्ही.च्या माध्यमातुन घेवुन,पोलीसांनी व्यापारास परत केले.**

दि. ०३/०७/२०१९ रोजी फिर्यादी राजेश संपतराज पोरवाल, वय ४५ वर्षे, धंदा व्यापार, रा. ४६ सोमवार पेठ, पुणे हे ॲक्टिवा स्कूटर नं. एम.एच.१२.एच.ई.८४८ वरुन बॅकेंत पैसे भरण्यासाठी जात असताना पायाजवळ ठेवलेली पैशाची बॅग पडली त्यामध्ये ४ लाख रुपये होते. त्यांनी तशी फिर्याद फरासखाना पोलीस स्टेशन येथे दिली. त्यानुसार मिसींग दाखल करुन, शितला देवी मंदिर, लोणार आळी, रविवार पेठ, पुणे येथे पडली होती. तेथील सी.सी.टी.व्ही. फुटेज मध्ये रस्त्यावर पडलेली बॅग उचलताना एक इसम दिसत होते. तसेच रस्त्यावरील सरकारी व खाजगी सी.सी.टी.व्ही. कॅमे-यांच्या सहाय्याने पैशाची बॅग उचलणारे व्यक्तीचा मार्ग शोधत पुढे उंटाडे मारुती मंदिर, के.ई.एम. हॉस्पीटल जवळ मंदिराच्या कॅमेरात, बॅग उचलणा-याचा फोटो व गाडीचा नंबर स्पष्ट दिसला. पोलीसांनी त्याचा शोध घेतला असता, सदर व्यक्ती शेखर कृष्णा जावळकर रा. ४६१, रास्ता पेठ, पुणे यास मिळाली. त्यास विचारपुस करता त्याने सांगितले की, बॅग उचलुन शितला देवी मंदिरामध्ये ठेवलेली आहे. त्यानंतर शितळादेवी मंदिरातील पुजारी सौ. शितल संजय परदेशी यांनी मंदिरात ठेवलेली बॅग जशीच्यातशी बाजुला ठेवली होती. ती ताब्यात घेवुन, सदरची बॅग फिर्यादी यांना दाखविली असता, ती त्यांचीच असल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर त्यांनी बॅगमध्ये ठेवलेले ४ लाख रुपये व इतर सामान आहे तसे असल्याची खात्री केली. सदरची ४ लाख रुपये असलेली बॅग ही फिर्यादी राजेश संपतराज पोरवाल यांना मा. श्रीमती स्वप्ना गोरे, पोलीस उप आयुक्त सो. परिमंडळ १, पुणे यांचे हस्ते देण्यात आली. त्यावेळी सराफ व्यापारी असोशिएशनचे अध्यक्ष व सदस्य हजर होते. सराफ व्यापारी असोशिएशन तर्फे पोलीसांचे आभार व्यक्त करुन सत्कार करण्यात आला.

एकंदरीत तपासात कोणताही धागादोरा नसताना पोलीसांनी पैशाची बॅग उचलणारा ज्य मार्गाने गेला. त्या मार्गावरील सर्व सरकारी व खाजगी सी.सी.टी.व्ही. कॅमे-याचे फुटेज तपासत असताना शोध लागला. मा. पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांनी शहरात जास्तीत जास्त लोकांनी दुकानात, खाजगी सोसायट्यांमध्ये, मंदिरावर तसेच इतर ठिकाणी सी.सी.टी.व्ही. लावण्याबाबत आवाहन केले. त्या आवाहनाला अनेकांनी प्रतिसाद दिला आहे. त्यानुसार उंटाड्या मारुती मंदिराच्या खाजगी फुटेजवरुन बॅग उचलणा-याचा शोध घेण्यात आला व व्यापा-यास ४ लाख रक्कम परत देण्यात आली.

सदरची कामगिरी श्री. श्रीकांत तरवडे अप्पर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर, श्रीमती स्वप्ना गोरे पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१ पुणे, सहाय्यक पोलीस आयुक्त फरासखाना विभाग पुणे श्री, प्रदीप आफळे यांचे मार्गदर्शनाखाली श्री.किशोर नावंदे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक फरासखाना पोलीस स्टेशन पुणे, तसेच तपास पथकाचे प्रभारी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक प्रतीक्षा शेंडगे, यशपाल सुर्यवंशी, पोलीस कर्मचारी विशाल चौगुले, आकाश वाल्मीकी यांनी केली आहे.